"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

WEB SITE : http://www.nkgsbsangh.org

E-MAIL : nkgsbs@gmail.com

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। इष्टं धर्मेण योजयेत्।।

मूल्य रु. ५

क्रमांक १ वर्ष : ३६ एप्रिल -जून २०१४

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

ठाणे मंच - मुंबई मंच सहर्ष सादर करीत आहे

# 'धूमशान'

# अनोखा नृत्य नाट्याचा आविष्कार आणि फॅशन शो - २०१४

**वेळ : शनिवार दिनांक १० मे २०१४, सायंकाळी ४.३० ते ८.००**

**स्थळ : कर्नाटक संघ सभागृह, माटुंगा (पश्चिम)**

- ज्ञातीतील सर्वांना विशेषत: पुरुषांना आवाहन : आपण एकपात्री किंवा आपल्या सहकाऱ्यांसह एखादं नाटुकलं किंवा करमणुकीचा कार्यक्रम सादर करत असल्यास संपर्क साधावा.

मंजिरी कुलकर्णी : ९६६५०९८११७ रसिका गायतोंडे : ९९६९७४४४०१

(सायंकाळी : ६.३० नंतर)

*(या संदर्भात कार्यकारिणीचा निर्णय अंतिम राहील याची कृपया नोंद घ्यावी)*

- या कार्यक्रमाला आपण सर्वांनी उपस्थित राहून कलाकारांना उत्तेजन देण्यासाठी हे अगत्याचे निमंत्रण.

- ठाणे-मुलुंड मार्गे एक बस आयोजित केलेली आहे. आपली नांवे खालील व्यक्तींकडे नोंद करावी.

- या कार्यक्रमास आपल्या सोबत तीस किंवा अधिक व्यक्तींस घेऊन येणाऱ्यास पारितोषिक व सत्कार. आपल्या सोबत येणाऱ्या व्यक्तींची नांवे उशिरांत उशिरा एक दिवस अगोदर कळविणे.

सुरेश पालेकर (ठाणे) : ९९६९४५५३७०

शैलेश गायतोंडे (बोरीवली) : ९८६९२११०५५

# संपादकीय

## जी.एस्.बी. टेम्पल ट्रस्ट, मुंबई, यांचे उपक्रम

माहीम येथील श्रीशितलादेवी मंदिर मुंबईतील सारस्वतानाच नव्हे तर सर्व सामान्य जनतेलाही परिचित आहे. त्या परिसरांतील बस थांब्यांचे व रस्त्याचे नांवही शितलादेवी मंदिराच्या नांवे आहे. हे मंदिर ज्या संस्थेच्या आधिपत्त्याखाली आहे त्यांच्या इतर सामाजिक उपक्रमांची वाचकांना माहिती असावी म्हणून हा प्रपंच.

या मंदिराची मालकी आहे जी. एस्. बी. टेम्पल ट्रस्ट यांची. जी.एस्.बी. (गौड सारस्वत ब्राह्मण) टेम्पल ट्रस्ट ही मुंबईतील सारस्वतांची सर्वांत जुनी संस्था आहे. या न्यासाच्या आधिपत्याखाली बाणगंगा येथील वाळुकेश्वर महादेव मंदिर, माहीम येथील श्री शितलादेवी मंदिर, श्री. शांतादुर्गा मंदिर व श्री. अक्कलकोट स्वामी महाराज मंदिर, कापडबाजार, माहीम, येथील श्री. मुरलीधर मंदिर ही देवालये येतात. तसेच बाणगंगा येथील जुना ऐतिहासिक तलाव व ठिकठिकाणच्या कित्येक निवासी इमारतीही न्यासाच्या मालकीच्या आहेत. टेम्पल ट्रस्टचे श्री. प्रवीण कानविंदे (अध्यक्ष), श्री. प्रभाकर नेरुरकर (सचिव), व श्री. पुरुषोत्तम शेटये (खजिनदार) हे कायम विश्वस्त आहेत व कार्यकारी मंडळावर दर तीन वर्षांनी नऊ विश्वस्त निवडणुकीद्वारे नियुक्त होतात.

देवालयांतील नित्यनैमित्तिक पूजा अर्चा व उत्सवांव्यतिरिक्त न्यासातर्फे कांही सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यांतील दोन महत्वाच्या उपक्रमांची इथे माहिती दिली आहे. तरी सर्व गरजूंनी त्याचा लाभ घ्यावा.

### कुटुंबाचे देव राखण्याची व्यवस्था

काही सारस्वतांना त्यांच्या वैयक्तिक अडचणीमुळे पारंपरिक देव घरी पूजणे शक्य होत नाही. असे देव सांभाळण्याचे भुलेश्वर येथील मंदिरात सोय आहे. हे देव मंदिरात ठेवण्याच्या जागेचे नुकतेच नूतनीकरण करण्यांत आलेले आहे. येथे पावित्र्यही राखले जाते. प्रत्येकाचे देव संगमरवराच्या मोठ्या आकाराच्या चौकोनी कप्प्यात ठेवण्याची सोय आहे. न्यासाचे पुरोहित रोज, सकाळसंध्याकाळ या देवांची पूजा करतात.

### शैक्षणिक व वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक साहाय्य

न्यासातर्फे गरीब, गरजू व्यक्तींना व त्यांच्या पाल्यांना शिक्षणासाठी व वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. छापील पत्रकानुसार अर्ज आल्यास योग्य ते निकष लावून आर्थिक साहाय्य देण्याची व्यवस्था आहे.

वर नमूद केलेल्या उपक्रमांचा ज्यांना लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा. जी.एस.बी. टेम्पल ट्रस्ट, पहिला मजला, बालाजी रामजी बिल्डींग, भुलेश्वर रोड, मुंबई - ४०० ००२. (मधुरध्वनी - २२४०४४८२)

हे परीक्षेचे दिवस आहेत, त्यानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा.... !

१ एप्रिल २०१४

# एज्युकेशन सोसायटी - शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थींनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी | ३० जून २०१४ |
| महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी | ३० जुलै २०१४ |

(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील)
याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा, ही विनंती.

**विषय :**

- संगीत, नाटक, नृत्य
- व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण
- राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा (सी.ए. कॉस्टिंग, एन.डी.ए. सिव्हील सर्व्हिसिस इ)
- संगणकावर आधारित प्रशिक्षण
- वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास
- जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा
- शैक्षणिक सहल (सांपत्तिक परिस्थितीची अट नाही)

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्याकारिणीच्या विचाराधीन असेल.

**कर्जाऊ शिष्यवृत्त्या :** उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्त्या देण्यात येतात.
भारतातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (प्रतिवर्षी १,००,०००)
परदेशातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (एक रकमी)

**गृहिणींसाठी :** गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करुन शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
शैक्षणिक पात्रता : बारावी

विशेष माहितीसाठी कार्यालयात येऊन चौकशी करावी अथवा २३८७७३०१ वर कार्यालयीन वेळांत संपर्क साधावा.

## प्रकाशझोत

### NKGSB CO-OP BANK BECOMES AUTHORIZED DEALER OF FOREIGN EXCHANGE

NKGSB Bank has received the AD I license from RBI. Bank can now, of its own, cater to demands of all their clients in respect of Foreign Exchange such as :

1. Import Transactions : Opening of Letter of Credit, Handling of Import Documents under Letter of Credit / Collection.
2. Import Finance : Short Term Credit, External Commercial Borrowings
3. Export Transactions : Collection of Bill proceeds, Advising of Letter of Credit.
4. Export Finance at concessional rates by way of Packing Credit in INR & foreign currency and Post shipment Finance.
5. Opening of NRO and FCNR accounts and NRE accounts in all branches.
6. Inward / Outward Remittances.

### 'प्रकाशफुले' या सौ. नलिनी संझगिरी यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

या जगातले दु:ख, अन्याय या गोष्टीबद्दल आपण कायमच तक्रार करीत असतो. कारण सामान्य माणसे आणखी काय करु शकणार ? पण या अन्यायाला वाचा फोडणारे, दु:खावर फुंकर घालणारे काही दैवी दूतही या जगात जन्म घेतात, आणि लोकांचे जीवन सुकर करतात. अशाच काही दूतांना 'प्रकाशफुले' हे अभिधान देऊन "सौ. नलिनी संझगिरी" यांनी त्यांच्या कार्यावर-चरित्रावर 'प्रकाशझोत' टाकला आहे. कै. विनोबा भावे, बाबा आमटे, बहिणाबाई चौधरी, सुनीता देशपांडे तसेच जयंत नारळीकर यांसारख्या विविध क्षेत्रांत महनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आपल्याला परिचितच आहेत, पण या परिचयाला पुन्हा एकदा समर्पक शब्दात उजाळा देण्याचे काम नलिनीताईंनी केले आहे. त्याचबरोबर 'श्रीपाद तालमकी, हिरा कर्नाड, कालिंदी मुझुमदार, मुक्ताबाई मंगळूर, रुक्माबाई तल्लूर' यांसारख्या अपरिचित, पण गुणी व्यक्तींचे विविध पैलूही आपल्यासमोर रेखाटले आहेत. ओघवती भाषा, आणि सर्व महनीय व्यक्तींविषयी दिलेला अभ्यासपूर्ण तपशील, ही नलिनीताईंच्या पुस्तकांची वैशिष्ट्ये ! त्यामुळे ते वाचनीय झाले आहे !

**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine India & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.), Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## विजूले चुटकुले

चलॉ बापायक : पप्पा, तुंवे तुगेच्या लग्नावेळार नाच केल्लो?
बापूय : ना पुता. पूण लग्नानंतर तुगेल्या आवैल्या इशाऱ्याचेर आजपर्यंत नाचतेर आसा.

डेण्टीस्ट : तुगेले मुकाल्ले तीन दात कशे पडले?
मंगेश : बायलेन चपाती खूप कडक केल्ली.
डेण्टीस्ट : मागीर तुंवे खावच्यांक ना म्हणकाशिल्ले
मंगेश : तेंच तर केल्ले हांवे

विजय सदानंद वागळे, ठाणे

नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतीच्या नियमानुसार

### "नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. वृत्तविलास" या त्रैमासिकाचे प्रकटन

१. **प्रकाशन स्थळ :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई – ४.
२. **प्रकाशन अवधी :** त्रैमासिक
३. **मुद्रक, प्रकाशक आणि संपादक :** दत्तात्रय नागेश नाडकर्णी, राष्ट्रीयत्व : भारतीय
**पत्ता :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई – ४.
४. **मालक :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी.रोड, मुंबई – ४.

मी, दत्तात्रय नागेश नाडकर्णी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

**मुंबई, १ मार्च २०१४** **दत्तात्रय नागेश नाडकर्णी** – प्रकाशक

### ठाणे मंच वधूवर सूचक मंडळ - माहीम शाखा

यानंतर माहीम शाखेचे काम खालील भगिनी बघतील.

सौ. अनन्या अनिल नाडकर्णी व सौ. माधवी उल्हास सबनीस

७०२, शिवाना सोसायटी, टेलीफोन कॉलनी समोर, मोगल लेन, माहीम.

फोन : २४३६६७०० / ९८६७०४९३५७

# ठाणे मंच सहल

ठाणे मंचने या वर्षीची सहल ता. १२ जानेवारी २०१४ रोजी वसईच्या वेस्ट पाम बीच येथे आयोजित केली होती. मुंबईहून दोन व ठाण्याहून एक अशा तीन बसेस भरुन लोक आले होते. गंमत म्हणजे मुखपत्रिकेतून जाहीर निमंत्रण येण्याआधीच तिन्ही बसेस भरुन गेल्या पण!

वसई पुलाचे दुरुस्तीचे काम सुरु असल्याने येता जाताना विलंब होईल अशी आम्हांला काळजी वाटत होती पण सुदैवाने सकाळी आम्ही दहा-सव्वादहा पर्यंत रिसोर्टवर व रात्री आठ वाजेपर्यंत घरी पोचलो. मिसळ, पाव, इडली, वगैरे नाश्ता झाल्यावर काही जण वसईतील अतिशय पुरातन अशा रमेदी माता व सेंट झेवियर्स या ४०० वर्षापूर्वी बांधलेल्या चर्चेसना भेट देऊन आले. आपल्या देवळाप्रमाणेच वसईतील ख्रिश्चन लोकांचे श्रध्दास्थान ही चर्चेस आहेत. काही जणांनी रिसोर्ट वरच राहून पोहण्याची, झोपाळ्यावर झोके घेऊन मजा केली. तर काही जणानी बऱ्याच दिवसांनी भेटलेल्या नातेवाईकांबरोबर पोटभर गप्पा मारल्या.

या वर्षी मुंबई मंच व ठाणे मंच यांनी एकत्र येऊन कार्यक्रम करायचे ठरत होते. अनायासे सहलीच्या निमित्ताने एकत्र आल्याने सहज बोलता बोलता न ठरवता अनौपचारिक असे कार्यक्रमाबद्दल बोलणे झाले व १० मे ला कार्यक्रम करायचा असे ठरले.

बटर चिकन, आलु कॅप्सीकम, भेंडी मसाला, दाल फ्राय, रोटी असा मस्त मेनू सर्वांना आवडलाच शिवाय मधुर ताकाने सर्वांना तृप्त केले. जेवणानंतर आलेली सुस्ती घालवण्यासाठी संगीत खुर्ची, पासिंग द पार्सल सारखे ग्रुप गेम्स घेण्यात आले. लहानमोठ्या सर्वांनीच उन्हाची पर्वा न करता खेळण्याची मजा लुटली.

यावेळी एका गोष्टींमुळे सर्वांचा विरस झाला ती म्हणजे कुणा एकाच्या गफलतीमुळे एका खोलीची चावी हरवली गेली व त्यामुळे आमच्या एस. के. देसाई यांनी स्वत: सर्वांसाठी बनवून आणलेल्या मिक्स भाज्यांच्या लोणच्याची चव ही कुणालाच चाखता आली नाही कारण लोणच्याच्या बरण्या त्याच खोलीमध्ये राहिल्या पण देसाई काकांची वेगवेगळ्या तऱ्हेची लोणची तसेच हे लोणचेही आम्ही नंतर चाखल्याने मी एवढंच म्हणेन, 'चवीने खाणार त्यांना देसाई काका देणार.' असो.

श्री. प्रकाश वाघ व मंजिरी वेदविख्यात यांनी काही विनोद सांगितले. श्री. देवीदास नाडकर्णी यांनी एक प्रहसन सांगितले व लोकांचे मनोरंजन केले.

सहलीच्या दुसऱ्याच दिवसापासून आम्हाला अनेक दूरध्वनी आले व सर्वांनी सहलीला मजा आल्याचे सांगितले. काही जणांना अनेक वर्षांनी भेटलेले आप्त व ओळखीची माणसे पाहून अतिशय आनंद झाला तर काही जणांना थोड्या तणावमुक्त अशा वातावरणात छान वेळ गेल्याचा आनंद झाला.

पण खरा आनंद झाला तो सहल आयोजकांना मिळालेल्या सर्वांच्या उत्तम प्रतिसादामुळे व सहकार्यामुळे! आनंद वाटल्यामुळेच द्विगुणित होतो हे अगदी खरे!

*Thank you very much....*

**मंजिरी मनोज कुलकर्णी,**
ठाणे मंच

## A TRIBUTE TO SURESH D. NADKARNI - OUR BABA ON HIS 75TH BIRTHDAY

This article is dedicated to my dear Baba, Shri. Suresh Durgappa Nadkarni. He was born on 4th February 1938 to Shri. Durgappa Nadkarni (Fondly remembered as "SARKARKUN") and our Aji Smt. Shantabai Nadkarni (Fondly Called Gulabyaka). He is the youngest of 8 siblings and a favourite too.

He studied in Hindu High School, Karwar. A brilliant student, a scholar in Maths, he stood 21st in the SSC Exam of the then Bombay State in 1956. He then moved on to Mumbai & Graduated from VJTI as a Civil Engineer. He then joined the Bombay Municipal Carporation. He served BMC with great dedication & honesty. He worked mostly in water supply projects involving Ulhas River Scheme, Upper Vaitarna Project, Bhatsa Project undercreek tunnel, planning & design. He retired at an honourable position in 1996.

In 1966, he married my mother, the then, Kum. Lata Ramkrishna Pandit. My Parents, a made for each other couple are a role model for the younger generation. Their love for humanity, the bond they share with all relatives & friends is indeed praiseworthy. Special credit to my mother, who with her loveful nature looked after both my grandmothers.

Baba has great love for his native place, Karwar. He always tells me & my tai (Sujata) amazing stories about his childhood. The beautiful seashore at Karwar is very close to his heart. The lovely moments he shared with his cousins & siblings at our ancestral house near Murlidhar Math still give immense joy and pleasure to him.

My Baba, is a man I adore & a man who has a profound effect on my life. Our childhood was indeed a fairytale with Baba around, nurturing us always with his love & guidance. A great teacher, he taught me, my tai & many students difficult sums in Maths with an amazing knack of making complex problems simple. Every Sunday he took us to Talaopali for a boat & tonga ride.

He is a mentor to his grandchildren Rohan & Sonia too. his accommodative, charitable nature without expecting anything in return & nature of appreciating others multiple times for any ordinary work makes him "EXTRA ORDINAIRE." His well drafted English, his disciplined &

systematic, to the point approach to anything... all these add jewels to his crown. Our Baba is indeed an elegant dignified man with a remarkable quality of being content with small things in life.

We celebrated his 75th b'day on 4th February 2013. Even our NKGSB Sangh celebrated his 75th b'day in Nov. 2013 along with 75th b'day of other persons of our community at Antonio D'silva High School, Dadar.

**We love you ....BABA**

(Sponsored)

**Nandita Shashank Samant**
**U.S.A.**

# कितलें ससार - कितलें कठीण

उलोवचे कितले ससार - करचे कितले कठीण
पाडोवचे कितले ससार - घडोवचे कितले कठीण
खावंचे कितले ससार - रांदचे कितले कठीण
रोवचें कितले ससार - वाडोवचे कितले कठीण
लग्न करचे कितले ससार - संवसार करचो कितले कठीण
जन्माक घालचे कितले ससार - पोरांक वाडोवचे कितले कठीण
पिंदचे कितले ससार - शिंवचे कितले कठीण
बडबड करचे कितले ससार - गप्प रावचे कितले कठीण
खर्चुचे कितले ससार - जोडचे कितले कठीण
दोस्ती तुटोवची कितली ससार - जमोवची कितली कठीण
रागार जावचे कितले ससार - शांत रावचे कितले कठीण
वाच्चे कितले ससार - बरोवचे कितले कठीण

विठ्ठलराय भट
०९२२१३०९७५८


www.kccgoa.in
वीण विश्वासाची, सोबत निसर्गाच्या कुशीची
कुणाल कन्स्ट्रक्शन म्हणजे उत्तम बांधकाम, कल्पक वास्तुशास्त्र आणि सर्वोत्तम सुविधांची विश्वासार्हता. विश्वासाच्या याच विणीतून साकारलेल्या गोव्यातील 'सुखसमृद्धी' संकूलात आजच तुमची वास्तू पक्की करा आणि मग अनुभवा निसर्गाच्या कुशीत नटलेलं तुमचं समृद्ध संपन्न आयुष्य.
प्रदूषणविरहीत अशा वातावरणात राहून तुम्हाला अधिक संपन्न असं मानसिक आणि शारीरिक दीर्घायुष्य अनुभवता येईल यात काही शंकाच नाही.
सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर दीर्घायुष्याचं वरदान ठरेल हे नक्कीच.
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर, मंगेशी, फोंडा- गोवा
देखणा निसर्ग | प्रदूषणमुक्त हवा | उत्कृष्ट बांधकाम | मुबलक पाणीपुरवठा
मंगेशीचा मंगेश, म्हार्दोळची म्हाळसा वेलिंगचा नृसिंह, मडकईची नवदुर्गा अशा अतिशय प्रसिद्ध मंदिरांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर.
फ्लॅटस् उपलब्धः 1 रुम किचन, 1 बी.एच.के, 2 बी.एच.के
प्रोजेक्ट मान्यताः गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्यः नामवंत वित्त संस्था
a Project by: KCC कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
मुंबई ऑफिसः श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड बँक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:2683 3841/47/ 72. मोबा: 98336 36451
फॅक्सः 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in
गोवा ऑफिसः टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबाः 98209 33352, 98206 33321
गोवा साईटः 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

## प्रतिक्रिया

## MORE ABOUT SUJATA DIVEKAR

In the January issue of 'Mukhapatrika,' there was an article, 'UNUSUAL STORY OF VIVEK AND SUJATA DIVEKAR' written by my husband Ashok Divekar. Although by and large a good man, he has not been fair to our daughter-in-love Sujata. Hence a few words about her.

Sujata has proved to be an excellent vet in her profession but she is an animal lover at heart and has a strong liking for pets. While in school, she used to bring back her Tiffin box empty and clean. Mum used to be very happy, till one day a neighbor told her that he saw Sujata feeding to small pups on her way back to school !

Sujata obtained her vet degree from Mumbai. As a young vet, one of her numerous touching experiences is worth narrating. Her first job was at the Mumbai race course. One day she was asked to attend to an elephant whose back was badly injured by the metal from the Ambari. Trembling with fear that the big animal might knock her off, she anyway climbed upon a ladder with a bucket of antiseptic lotion, cotton, etc. and started cleaning the putrid wound. Sujata was pleasantly surprised when the animal seemed to like being lovingly treated. She finished dressing and bandaging, climbed down, patted the animal and surprised to see an expression of affection in the elephant's eyes.

Sujata appeared for the local vet exam about four years after the couple shifted to New Zealand. Simultaneously she also conceived! She is now a senior vet at a popular clinic. It is routine for her to get some unusual cases. One funny case is worth sharing with the readers.

Once an old man brought his small dog with a swollen tummy. Doc, he said, there's something wrong with my dog. His tummy is swollen. He does not eat.

All tests did not reveal anything. Sujata recommended an operation to examine the interiors. When this was done, out came the owner's woolen sock! What had happened was, during a prolonged absence of the owner, the dog swallowed the sack because it had the owner's smell! Sujata cleaned and stitched the doggy back and told the owner. Be careful, don't leave the dog alone when you go out for long.

True enough, six months later, the pair was back at the clinic with the same problem. Sujata had to open the tummy again and lo and behold she found the sock again! When the owner was called and debreifed, the owner advised. This time do not stitch him. Put a zip instead!

**Sou. Sheila Divekar, Pune**

# “एन्. के. जी. एस्.बी.” वधू-वर सूचक मंडळ - “एक प्रेमळ कटाक्ष”

गेली दहा महिने माझी पत्नी सुलभा (पॉप्युलर नांव सिंधू) आपल्या संघाच्या वधू-वर सूचक मंडळाचे काम सांभाळत आहे. मी झेरॉक्स, पावत्या देणे, शाखेचे फॉर्मस् एकमेकांना देणे वगैरे किरकोळ तरी महत्वाची कामे इमानेइतबारे करतो. एक समाजसेवा म्हणून आम्ही हे व्रत घेतले. त्यांतला कामाचा आवाका बघून ते एक व्रतच आहे असं आतां वाटतं. कांही कौटुंबिक कारणानेही हे काम आतां झेपत नाही. म्हणून जानेवारी २०१४ च्या मुखपत्रिकेतून तिने तसे जाहीर केले. तेंव्हा हे पुण्याचे काम समजून कांही सूज्ञ-मंडळींनी पुढे यावे. हे काम करतांना बरेच बरे वाईट अनुभव आले. तेही वाचकांना सांगावेत असं वाटलं. शिवाय वधू-वर विवाह हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणून हा प्रेमळ कटाक्षांचा प्रपंच करतो!

अमेरिकेतील एका वधूच्या आईने माझ्या बहिणीकडे (सुधाकडे) माहिती विचारली. तेव्हां तिच्या सांगण्यावरुन पत्नीने ती माहिती अंधेरीच्या तिच्या बहिणीला दिली. तेव्हां तुझी भावजय किती छान माहिती देते म्हणून तिनं सुधाकडे कौतुक केलें. तेव्हां आपल्या या उपक्रमाबद्दल सार्थक झाल्यासारखं वाटलं!

प्रथम उपवधूच्या अपेक्षांबद्दल लिहितो. आतां मुली जास्त शिकलेल्या आहेत. साहजिकच त्यांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत पण कांही जणींचे दरमहा पन्नास, साठ हजार रुपये पगारच त्यांच्या लग्नाच्या आड येतात असं दिसून येतं! कारण तेवढ्या ताकदीचे मुलगे कमीच दिसून आले!

पूर्वी मुली आपल्यावर लाईन मारणारा मुलगा पसंत करायच्या. आतां त्या आपल्याच लायनीत म्हणजे जवळ राहणारा पाहिजे म्हणतात. म्हणजे एका वांद्र्याला राहणाऱ्या व नोकरी करणाऱ्या मुलीने जोगेश्वरी ते दादर पर्यंतचा मुलगा पाहिजे अशी अपेक्षा केली आहे. सेंट्रल रेल्वेवर राहणाऱ्या मुलीला वेस्टर्नवाला नको असतो. नव्या मुंबईत राहणाऱ्या मुलीला ठाणे पर्यंतचा चालतो. एका परिने ते बरोबर वाटते. कारण नोकरी व घर सांभाळायची दुहेरी कसरत जास्त करुन मुलींनाच सांभाळावी लागते.

कांही मुलींनी वर “मध्यमवर्गीय नको, व्यावसायिक नको,” अशा अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. घर असेल तर, तर ते भाडयाच्या घरांत नको, ‘ओनरशिप’ हवे असे म्हटले आहे. व्यावसायिक असेल तर त्यांत मुलांचा वाटा किती ? अशीही विचारणा होते. त्यामुळे वरांची वाट लागणार अशी भिती वाटली. कांही उच्चशिक्षित वधूंनी वराचा पगार साठ हजार पर्यंत पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

पूर्वी मुली परदेशात जायला उत्सुक असत. आतां नको म्हणतात. गंमत म्हणजे परदेशात स्थायिक झालेल्या वरांना इकडच्या मुली मिळणं दुरापास्त झाले आहे. काळ किती बदलतो आहे हे निराळं सांगायला नकोच!

घटस्फोटित वधू-वरांचे बरेच फॉर्मस आले. अर्थात वधूंचे जास्त होते. पण आनंदाची गोष्ट म्हणजे बऱ्याच जणांची लग्ने जुळली असल्याचे समजले, तेव्हां जीवाला बरे वाटले! मुलं झाल्यावरही आपल्या चांगल्या जोडीदारांपासून घटस्फोट घेणाऱ्या काही वधूंची प्रकरणे पाहून वाईट वाटले. कोणाचे कसे, केव्हां, काय चुकले ते दुसरी बाजू समजल्या शिवाय कळत नाही. तेव्हां अशा नाजूक विषयावर न बोललेलंच बरं!

मुलांच्या अपेक्षा म्हणजे "मुलगी सुशिक्षित, गृहकृत्यदक्ष, सर्वांना सांभाळून घेणारी पाहिजे" अशाच आढळल्या. बहुतेक सर्वांनाच "नोकरी करणारी पाहिजे" असं वाटतं. आताच्या महागाईच्या दिवसांत अशी अपेक्षा गैरवाजवी म्हणतां येणार नाही. गंमत म्हणजे वरापेक्षा वधू बघायला येणाऱ्या पालकांची संख्या जास्त आहे. मुलींची कमी होत जाणारी संख्या हा सर्वांचा चिंतेचा विषय झाला आहे. पूर्वी जावई शोधायचे काम कठीण वाटायचे. आतां चांगली सून शोधणे जिकरीचे झाले आहे. "कालाय तस्मै नम:" हेच खरे! पत्रिकेचे प्रस्थ वाढले आहे. जन्म-वेळ, रास, गोत्र, नाड वगैरेना जास्त महत्व दिलं जात आहे. टीव्ही वरही निरनिराळया राशी चक्रासारख्या निराळया कार्यक्रमातून अमक्या राशीला तमकी रास जुळतं नाही असे वरचेवर सांगितले जाते. या दुष्ट-चक्रातून पालकांनी बाहेर पडावं.

"पत्रिका न बघता आम्ही लग्न करुन सुखी झालो" असं सांगणारे बरेच पालक भेटले. प्रेम विवाहात कुठे पत्रिका वगैरे पहातात ?

कांही पालकांनी पुढील चांगल्या सूचना केल्या :-

१ ) ई मेल कॉलम फॅार्मात टाकावा. २ ) हे काम संगणीकृत करावे.

आपल्या संगणक तज्ज्ञांनी याबाबतीत रस घेऊन मंडळाला योग्य मार्ग दाखवल्यास त्याचं स्वागतच होईल.

पालकांनी फॉर्म पत्रिकेवरुन संपूर्ण नीट भरावा. म्हणजे कोणास माहिती काढत बसावे लागणार नाही. रंगीत फोटो छान दिसतात. झेरॉक्स चांगले येत नाहीत. लग्ने जुळली असल्यास ताबडतोब त्या शाखेकडे कळवावे ही विनंती.

"मुलीचे लग्न जमत नाही हो... तुमच्याकडे येऊन काय फायदा ?" असे वैतागून उद्‌गार काढणारे एक-दोनच पालक भेटले!

वर "एम.बी.ए." उच्च पदवीधर असला तरी वधूचं पालक तो आधी कुठली डिग्री घेऊन उत्तीर्ण झाला आहे कां ? ते पहातात आतां "वधू परीक्षा" ऐवजी "वर परीक्षा" म्हणायचे दिवस फार दूर राहिलेले नाहीत हे पटले!

"एक रास, एक गोत्र, एक नाड चालत नाही" अशा भविष्यावर खूपजण विश्वास ठेवतात. तेव्हां पत्रिकेवर अति विसंबून राहण्यापेक्षा एकमेकांचा स्वभाव घरांतले लोक त्यांचे विचार, वातावरण वगैरे समजून घेतले तर ते जास्त बरं होईल. वधू-वरांनी एकमेकांना समजून मान देऊन राहणें केव्हांही श्रेयस्कर. अति खोलात जाऊ नये. डॉ. दाभोळकरांचे विचार म्हणजे ज्योतिषांच्या पत्रिकेवर का अवलंबून रहाता ? वगैरे लक्षांत घेतले पाहिजेत.

वधू-वर सूचक मंडळाचं काम तसं मजेशीर आहे. आम्ही फक्त शुक्रवारी संध्याकाळी साडे चार ते साडे सात टाईम ठेवला आहे. एकंदर भल्या मोठया सहा पिशव्यांमध्ये सुमारे २० फायली आहेत. जमेल तसं शुक्रवार ऐवजी इतर दिवशी गरजूंना बोलावतो. अनेक कुटुंबाच्या ओळखी होतात. कांही पालक पाया पडून जातात. ज्येष्ठ नागरिकांच्या वेळेचा सदुपयोग होतो.

वधू-वर सुचक मंडळाचं कार्य खरंच मोठं आहे. म्हणून जमेल तसे थोडे प्रेमळ कटाक्ष टाकले. त्यांत दक्ष राहून थोडं लक्ष देत आपण ते गोड मानून घ्यावेत असं मला वाटतं तुम्हांला काय वाटतं ?

(प्रायोजित)

**दिनकर कुलकर्णी, ठाणे**

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| अंकिता आनंद आरस, कलकत्ता | व | साहिल पटेल, अमेरिका |
| विजय रवींद्र बोरकर, लंडन | व | अमृता जी. नायक, लंडन |
| निखिल विक्रम कसबेकर, अमेरिका | व | नम्रता भरत राजाध्यक्ष, पुणे |
| अभिषेक उदय कुलकर्णी, हाजीअली | व | शमिका प्रफुल्ल माळोदे, चेंबूर |
| आदित्य वेंकटराव नाडकर्णी, माहीम | व | राजिता मोहन नाईक, पणजी |
| आनंद योगेंद्र पिकळे, बोरीवली | व | राजेंद्र रवींद्र सावंत देसाई, ठाणे |
| पल्लवी गुरुदत्त स्थळेकर, अंधेरी | व | करण राजीव महाजन, अंधेरी |
| रश्मी शशिकांत स्थळेकर, वांद्रे | व | राहुल नीलकंठन, बंगळूर |
| गौरीश शशिकांत तेलंग, दहिसर | व | नम्रता चंद्रकांत वागळे, सांताक्रुज |

## ऋणनिर्देश

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात पृ. १२ वर 'हसवाफसवी' हा लेख प्रसिध्द झाला ती श्री. दिनकर कुलकर्णी, ठाणे, यांनी लिहिला होता.


**MIPL**

**MANGSIDHESH INVESTMENT PVT. LTD.**

| | | |
|---|---|---|
| Financial Advisors | Equity Trading | Public |
| Mutual Funds | RBI Bonds | LIC, Mediclaim |
| Postal Schemes | | |

**Corporate Office**

Bldg. No. 1, Flat No. 1A, Saraswati Baug, HFS Road, Jogeshwari (E), Mumbai - 400 060.

Tel.: 2836 2057 / 2824 5298 / 6457 1272 - 85

## THE EPITOME OF SUCCESS - VIKRAM WAGH MD OF LAFARGE INDIA, WORLD LEADERS IN CONSTRUCTION MATERIALS

Vikram is the grandson of Late M. N. Wagh (Sadashivgad/Dadar), Commissioner of Income Tax and Tax consultant to 'TATA' Group and son of Aroo and late Meena, Chembur. Vikram is a Chemical Engineer and M.B.A. He joined BASF and was trained in Germany. He represented BASF (India) in South East Asia Conference in Hongkong and presented a paper.

In 2002 he joined, "Yale" in U.S.A. - Ivy League College ranked 4th in the world and in 2004 completed M.B.A. with concentrations in Strategy and Finance and was appointed to the Dean's Advisory Council. He was picked up by "Lafarge" in the same year.

'Lafarge' is a French Company and world leaders in construction materials including cement with operations in 78 countries and with an annual turnover of 20 billions. It was included in Fortune 500 list in 2012. "Lafarge" and "Holcim" together have 70% of world market. Starting as Asst. to the President, Vikram worked on strategy and project Implementations and in 2006 took the role of Director of "Manufacturing and Operations" for North East U.S.A. based near Baltimore. In 2007 his role expanded to cover South East U.S.A.

In this role he oversaw plant design, project Management and cost control for 54 sites with a total capacity of 65 Million Tons.

From 2009, he served as "Vice-President" for the mid-Atlantic and in 2010, the Western New York business was added to his portfolio. In 2011 his role was again expanded to include the Asphalt Business across East U.S.A with 12 Manufacturing sites, one resale site and 4 Asphalt Plants with an Annual capacity of 15 Million Tons.

He was selected as one of the promising young executives from all over the world in a core group who were groomed to take higher responsibilities and made regular visits to Paris for brain storming sessions and interaction with top Management.

India continues to be a bright spot for Lafarge in the Global Economy. He has now taken over as M.D. in India since 2012 and at 46 is one of the youngest Indians in a Multinational Company of such magnitude and has achieved this position in a span of 7 1/2 years.

He is a great human being and has lust for good things. Has a vast reservoir of knowledge on variety of subjects and is an avid reader and has a vast collection of books.

He is a connoisseur of food and has a passion for vintage wines. He has fetish for watches and has an exclusive collection. Listens to world music

and drives swanky cars and loves going for long rides on his "Harley Davidson." He even has a flying Licence!

He is obsessed with perfection in whatever he does and humility, simplicity and devotion to duty are his virtues. His only son - 16 year-old Rohan was selected for exceptional performance in Global Talent Search of "John Hopkins University" and was felicitated by them.

Vikram misses his mother who loved him for his caring nature and balanced mind. He believes her blessings are with him, always.

It is worth mentioning that in 2000 when his mother was diagnosed for terminal lung cancer he immediately purchased a "Merc" so that she could travel in comfort for her regular visits to Hospital. It was also her lifetime wish to own a Mercedes Car considered as "Ultimate in driving," in those days.

Vikram takes great care of his father and he and his sister have taken him for holidays to exotic places such as Hawai, Alaska etc. He also took him to New Orleans-home of Jazz music, where music is played on the sidewalks and have stayed in best of luxurious hotels including Pent House in Hyatt. Recently he was in Singapore where he went for a spin in Ferrari car.

He is aware that success is a heady stuff and has to be used sensibly; otherwise your fans will soon disappear and you will only has "Havells" Fans!

Managing risks is a key to success. The bottom line is being a good sensitive individual. Many successful money makers are miserable failures as human beings. There are people with money and fame but a few with such sterling qualities.

Recently he donated to Yale in honour of his parents "Organizational Behaviour. Interview Room." in new campus and was invited in January this year for three day conference on "Business + Society". "Leadership in an increasingly Complex World". Some of the eminent speakers were former chairman of the Federal Reserve, Former President of the World Bank and Global C.E.O. of Pepsico Inc., all Ex-Students of "Yale".

Vikram met the Dean who told his son. "Your Daddy has worked under me in a project and was my favourite student of 2004 Batch."

He is now on the threshold of scaling new heights and has a daunting task ahead in gloomy economy. So far, his life has been a many a splendoured thing. When asked how can he be so calm and cool when provoked, he said, "Tiger does not lose sleep over sheep's comments", and further added. "Life is once to live so live it well".

Any Tiger will be proud of such illustrious cub.

## निधन

| | | |
|---|---|---|
| अशोक वैकुंठ भेंडे | (सदाशिवगड) | चेंबूर |
| साधना गणपत देसाई | (कडवाड) | डोंबिवली |
| शालिनी विद्याधर दिवेकर | (कणसगिरी) | विरार |
| माधवी (विजया) भालचंद्र दुभाषी | (मखेरी) | पारले |
| अमीत अरुण दिवेकर | (केरवडी) | दादर |
| राजेंद्र गजानन गायतोंडे | (हळगे) | कांदिवली |
| नीला रतन हेरवाडकर (पूर्वाश्रमीच्या उषा वसंत (वशा) वागळे) | (बाड) | बेळगांव |
| स्मिता (गुलाब) भास्कर कुलकर्णी | (अवर्सा) | पारले |
| * सुनंदा प्रभाकर (पबी) कुलकर्णी | (हळगे) | पुणे |
| ऊर्मिला मंगेश मिटबंदर | (मिटबंदर) | चुनाभट्टी |
| शीला रमेश मणेरीकर (पूर्वाश्रमीच्या शीला विश्वंभर वागळे) | (बाड) | ग्रांटरोड |
| सुशीला गणपती मुझुमदार | (अंकोला) | पारले |
| जगदीश शंकर नाडकर्णी | (मिटबंदर) | वाशी |
| कुंदा मोहन पालेकर | (बाड) | दिंडोशी |
| वामन विष्णु पावशे | (बाड) | दादर |
| नारायण (उल्हास) यशवंत पिकळे | (अंकोला) | मालाड |
| गीता हर्षद सबनीस (पूर्वाश्रमीच्या शीला विश्वेश्वर कसबेकर) | (कडवाड) | पुणे |
| गणपती (बाबू) दामोदर शानभाग | (शिराळी) | वांद्रे |
| इंदुमती गुरुनाथ स्थळेकर | (अंकोला) | मुलुंड |
| लक्ष्मीकांत गणपती तेलंग | (व्हडले बाग) | बोरीवली |
| गजानन रुद्रा वाघ | (हारवाडे) | पनवेल |
| दिगंबर घनश्याम वागळे | (बाड) | अंधेरी |
| शरद श्रीकंठ वागळे | (माजाळी) | छत्तीसगड |
| सुहास प्रेमानंद वागळे | (माजाळी) | पुणे |
| लीला दिनेश वागळे | (हाणकोण) | दादर |
| मंगेश वामन वागळे | (माजाळी) | मुलुंड |
| रामचंद्र चंद्रहास वागळे | (नंदव्हाळ) | वांद्रे |
| सुरेंद्र यशवंत (अचा) वर्टी | (सदाशिवगड) | बोरीवली |

(* सुनंदा कुलकर्णी यांनी नेत्रदान केलेले आहे)

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

उल्लेखनीय देणग्या

## सौ. लता पालेकर यांच्या अमृत महोत्सवी जन्मदिनानिमित्त सुपुत्र जयेन व रोहन यांच्यातर्फे पाच लाख रुपयांची देणगी

'जॉन्सन ॲण्ड जॉन्सन' या ख्यातनाम कंपनीचे निवृत्त कार्यकारी संचालक श्री. विठ्ठल (बाळ) शिवानंद पालेकर व त्यांचे कुटुंबीय यांच्यावर सरस्वती व लक्ष्मी या दोघांचाही आशीर्वाद आहे यात शंका नाही. श्री. पालेकर हे सी.ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव जयेन हे सुध्दां सी.ए. च्या परीक्षेत गुणवत्ता यादीत सातव्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेले आहेत, नंतर अमेरिकेतील अत्यंत प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या व्हॉर्टन स्कूलमधून ते एम्. बी.ए. झाले. पालेकर यांचे धाकटे चिरंजीव रोहन हेही सी.ए. च्या परीक्षेत विक्रमी गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उतीर्ण झालेले आहेत व त्यावेळी त्यांना दोन सुवर्णपदके व आठ परितोषिके मिळाली होती. दोघेही आता अमरिकेत चांगल्या जागांवर काम करतात. पालेकर यांच्या सुविद्य पत्नी लता यांच्या शैक्षणिक यशाचा आलेखही कौतुकास्पद आहे. बी.ए. व एम्.ए या दोन्ही परीक्षेत गणित विषयांत त्यांनी प्रथम वर्गात प्रथम क्रमांक मिळविलेला आहे.

या सर्व सरस्वतीपुत्रांनी आपापल्या व्यावसायिक क्षेत्रात नावलौकिक मिळवून लक्ष्मीही संपादन केलेली आहे. ते सर्व आपल्या संपत्तीचा विनियोग दानधर्मासाठी करतात. अनेक सामाजिक संस्थाना ते सतत साहाय्य करीत असतात. आपल्या संघावरही त्यांचा विशेष लोभ आहे व ते वेळोवेळी सढळ हस्ते देणग्या देतात. अलीकडेच सौ. लता पालेकर यांचा अमृत महोत्सवी जन्मदिन साजरा करण्यात आला. त्या निमित्त जयेन व रोहन यांनी संघाला प्रत्येकी अडीच लाख म्हणजे एकूण पाच लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. लताताईंसाठी जीवेत् शरद: शतम् ही शुभेच्छा.

पालेकर कुटुंबीयांनी आतापर्यंत उल्लेखनीय देणग्या दिलेल्या आहेत त्यांची एकूण रक्कम २७$\frac{१}{२}$ लाख रुपये एवढी आहे. त्यांत आईवडिलांच्या पुण्यतिथी निमित्त वर्षोवर्षी दिलेल्या देणग्यांचा समावेश नाही.

## शतायुषी कृष्णाबाई वागळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ मुलांतर्फे एज्युकेशन सोसायटीला तीन लाख रुपयांची देणगी

पुणे येथील श्रीमती कृष्णाबाई गणपत वागळे यांना १ सप्टेंबर २०१२ रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली त्यावेळी मुखपत्रिकेच्या माध्यमातून संघातर्फे त्यांना जाहीर शुभेच्छा दिल्या होत्या, नंतर मे २०१३ मध्ये त्यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचे सुपुत्र सर्वश्री रामचंद्र व अशोक आणि कन्या श्रीमती शालिनी कमलाकर नाडकर्णी यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला तीन लाख रुपयांची देणगी मिळालेली आहे.

## श्री. शरद सलगर यांच्या द्वितीय पुण्यतिथीप्रसंगी पत्नी श्रीमती रेखा सलगर यांच्याकडून १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी

सदाशिवगड येथील ख्यातकीर्त सलगर मास्तर यांचे कर्तबगार व दानशूर सुपुत्र श्री. शरद सलगर यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रमाणे यंदाही त्यांच्या द्वितीय पुण्यतिथीप्रसंगी त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर यांनी पतीच्या स्मरणार्थ समाज सेवानिधीसाठी, वृध्दसेवानिधीसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी ५१ हजार याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी दिलेली आहे. २०१० साली ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात श्री. शरद सलगर यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते त्यावेळी मुखपत्रिकेच्या अंकात त्यांच्या टान्झानिया येथील ३५ वर्षातील यशस्वी वाटचालीबद्दल माहिती दिली होती.

## प्रा. प्रभाकर नाडकर्णी यांच्यातर्फे पत्नी श्रीमती मंगला यांच्या प्रथम पुण्यतिथीप्रसंगी एक लाख रुपयांची देणगी

२००३-२००४ हे वर्ष म्हणजे आपल्या एज्युकेशन सोसायटीचे शतसांवत्सरिक वर्ष होते. त्या अनुषंगाने त्या वर्षी ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमलनांत शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य केलेल्या दहा मान्यवर शिक्षकांचा जाहीर सत्कार करण्यात आला होता. त्यांत युनोतर्फे अनेक देशांत संख्याशास्त्रातील तज्ज्ञ व सल्लागार म्हणून कार्य केलेल्या गणित विषयाचे प्राध्यापक प्रा. प्रभाकर नागेश नाडकर्णी यांचाही समावेश होता. प्रा. नाडकर्णी आपल्या संघाला व एज्युकेशन सोसायटीला तसेच सेवाभावी संस्थाना वेळोवेळी देणग्या देत असतात. त्यांच्या पत्नी श्रीमती मंगला यांचे डिसेंबर २०१२ साली दु:खद निधन झाले. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या प्रसंगी प्रा. नाडकर्णी यांनी पत्नीच्या स्मृतीप्रीत्यर्थ संघाला एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्रीमती विजयादेवी (कुसुम) देसाई यांच्या २५ व्या पुण्यतिथीप्रसंगी कन्या श्रीमती शैलजा नाडकर्णी यांजकडून एक लाख रुपयांची देणगी

शिवाजी पार्क येथील 'किशोरी विहार' या नावाने प्रसिध्द असलेल्या वास्तूत राहणाऱ्या श्रीमती अंबिकाबाई कसबेकर यांना 'ताई' कसबेकर म्हणूनच सर्व कारवारकर ओळखत. ताई म्हणजे व्यक्ती नसून संस्थाच होती त्यांच्या प्रचंड गोतावळ्यात सासरचे व माहेरचे असंख्य नातेवाईक होतेच इतकेच नव्हे कारवारच्या शेतांतील 'रैत', शेजारी पाजारी व घरच्या मोलकरणीचे कुटुंबही होते. सर्वांच्या सुखदु:खाशी समरुप होऊन अडी अडचणीला आधार देण्याचा व त्यांच्यात उत्साह रुजविण्याचा त्यांचा स्वभाव होता. ताईची एक कन्या म्हणजे विजयादेवी ऊर्फ कुसुम. त्यांचा विवाह श्री. विठ्ठल देसाई यांच्याशी झाला होता. ते रंगाचे कारखानदार होते. भारतातील कापड रंग उद्योगाचे जनक अशी त्यांची ख्याती होती.

कुसुमताईंचे फेब्रुवारी १९८९ साली निधन झाले. त्यांच्या २५ व्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शैलजा मंगेश नाडकर्णी यांनी वृध्दसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्री. दिनकर वर्टी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ कन्या श्रीमती मीनल भुजले व रेखा तेलंग यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी

मूळ बाड या गांवातून नाशिक येथे जे वर्टी कुटुंबीय स्थायिक झाले त्यांतील एक म्हणजे कै. दिनकर वामन वर्टी सुमारे साठ वर्षापूर्वी त्यांनी तेथील मध्यवर्ती भागात 'माझदा' हे हॉटेल सुरु केले नंतर सुमारे तीस वर्षानी त्यांनी ते विकले. ते एवढे लोकप्रिय आहे की नाशिकचे ते एक लॅण्डमार्क आहे. श्री. वर्टी यांचे १९९३ साली दु:खद निधन झाले. त्यांच्या कन्या श्रीमती मीनल सतीश भुजले व रेखा मिलींद तेलंग यांनी अलीकडेच वडिलांच्या स्मृती प्रीत्यर्थ एज्युकेशन सोसायटीस पन्नास हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

## 'उल्लेखनीय देणग्या' गेल्या अंकातील चुकीची दुरुस्ती

गेल्या अंकात पृ. २३ वर 'श्री शंकर पिकळे कुटुंबीयांकडून आणखी दीड लाख रुपयांची देणगी' असे शीर्षक छापलेले आहे. त्याऐवजी 'श्री शरद पिकळे कुटुंबीयाकडून आणखी दीड लाख रुपयांची देणगी' असे शीर्षक हवे.


।। कै. दत्तात्रय वै. पालेकर (पोटली दत्ता), अमृतवाडी
यांचे कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण ।।

**PRACHI FOODS & CATERING SERVICES**
**OF PRAKASH GUDE**

- All types of Delicious Food • Pickles & Papad
- Poojari Available for Devkritya & Dharmakritya
- Our Home Made Goan Speciality-Tikhase Phov / Churma
- Dry Fish - Suke Bangde, Mori & Sungta

A - 305, Best Swasadan, Liliya Nagar, Near Kamat Club,
Goregaon (West), Mumbai - 400 062. ( 9869423494/28744683 )

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

*Sanjay K. Telang*
***Insurance Consultant***

Office : Br. No. 89F, Satelite Classic, 1st Floor, Caves Road,
Jogeshwari (East), Mumbai - 400 060.
Mob. : 98331 55349 Email : sanjaytelang@ymail.com

## संघास मिळालेल्या देणग्या

| | |
|---|---|
| १. श्रीमती मालिनी (मंगला) प्रभाकर नाडकर्णी यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमीत्त पती प्रा. प्रभाकर नागेश नाडकर्णी यांजकडून | १,००,००० |
| २. श्री. भिकोबा शेषगिरी मिटबंदर यांच्या स्मरणार्थ मेहुणे श्री. पांडुरंग गणपत बर्डे यांजकडून | ३०,००० |
| ३. श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्टकडून | ६,००० |
| ४. खालील व्यक्तींच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या वाढदिवसाच्या प्रसंगी हितचिंतकाकडून | |
| श्रीमती शरयू दत्तात्रय नाडकर्णी | ७,५०० |
| श्री. नागेश बाळकृष्ण बर्डे व | ७,५०० |
| श्रीमती सुधा चंद्रकांत फडणीस | ७,५०० |
| ५. श्री. मंगेश गोविंद मुझुमदार यांच्या १० व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या स्मरणार्थ | |
| पुत्र श्री. विनायक यांजकडून | १०,००० |
| पत्नी श्रीमती सविता यांजकडून | ५,००० |
| ६. श्री. शरद नागेश सलगर यांच्या द्वितीय पुण्यतिथीप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| ७. श्री. गणपतराव महेश्वर मुझुमदार यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुशीला यांजकडून | ५,००० |
| ८. श्री. दिनकर दत्तात्रय नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुनीता यांजकडून | १०,००० |
| ९. वडील श्री. वसंत मंगेश दुभाषी व आत्या श्रीमती कुसुम मंगेश दुभाषी यांच्या स्मरणार्थ मुलांकडून | २५,००० |
| १०. श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १,००१ |
| ११. श्रीमती लता विठ्ठल पालेकर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पुत्र | |
| श्री. रोहन यांजकडून, | २,५०,००० |
| श्री. जयेन यांजकडून | २,५०,००० |
| १२. प.पू. कैवल्यपूर मठाधिपती श्री. शिवानंद सरस्वती स्वामी महाराजांकडून संस्कृत पाठांतर स्पर्धेसाठी | ५,००० |
| १३. श्री. शिवानंद मंगेश वाघ यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी वार्षिक संस्कृत स्पर्धेत शिशुगटात भाग घेणाऱ्या २ मुलांना बक्षिसे देण्यासाठी कन्या श्रीमती मंगला व जामात डॉ. गजानन शिवराव नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| १४. श्रीमती मीना अरविंद वाघ यांच्या प्रेमळ स्मृतीप्रीत्यर्थ पती श्री. अरविंद (अरु) मंगेश वाघ यांजकडून | २१,००० |
| १५. श्री. नीना (सुमन) दिगंबर कसबेकर यांच्या १३ व्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. दिगंबर व कन्या श्रीमती संध्या व सुजाता यांजकडून | १,००१ |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | आईवडील श्रीमती मुक्ता आणि श्री. मधुकर आत्माराम वाघ व श्रीमती रत्नप्रभा व श्री. महेश्वर तेलंग यांच्या स्मरणार्थ श्री. दीनानाथ मधुकर वाघ यांजकडून | ५,००१ |
| २. | श्री. माधव रामदास नायक त्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या कुमारी मानसी माधव नायक यांजकडून | २,००० |

## वृध्दसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती उमा व श्री. त्रिबंक अनंत कसबेकर यांजकडून | १०,००० |
| २. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या द्वितीय पुण्यतिथीप्रसंगी पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| ३. | श्रीमती इंदिरा वासुदेव नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती आशा वासुदेव नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ४. | श्रीमती वनिता व श्री. विश्वनाथ वासुदेव वागळे यांच्या स्मरणार्थ श्री. अजितकुमार व कुटुंबीयांकडून विवाहाच्या सुवर्णमहोत्सवा निमित्त | ५,००१ |
| ५. | ७५ व्या वाढदिवसानिमित्त श्री. जयवंत भवानीशंकर पिकळे यांजकडून | ७,५०० |
| ६. | श्री. सुरेश दुर्गप्पा नाडकर्णी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त कन्या श्रीमती नंदिता शशांक सामंत यांजकडून | २५,००० |
| ७. | श्रीमती मंगला शामसुंदर शिरोळकर ह्यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी नातू श्री. महेश राजा वागळे यांजकडून | १,००१ |
| ८. | श्रीमती विजयादेवी (कुसुम) विठ्ठल देसाई यांच्या २५ व्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती शैलजा मंगेश नाडकर्णी यांजकडून | १,००,००० |
| ९. | श्रीमती लता (ललिता) मंगेश नाडकर्णी यांच्या पहिल्या पुण्यतिथीप्रसंगी पती श्री. मंगेश नारायण नाडकर्णी यांजकडून | ५,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती कृष्णाबाई गणपत वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र सर्वश्री रामचंद्र, अशोक व कन्या श्रीमती शालिनी कमलाकर नाडकर्णी यांजकडून | ३,००,००० |
| २. | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्टकडून | ६,००० |
| ३. | श्री. दिगंबर (मनोहर) गोविंद मुझुमदार यांच्या १० व्या पुण्यतिथीनिमित्त | |
| | श्रीमती सविता मंगेश मुझुमदार यांजकडून | ५,००० |
| | श्री. विनायक मंगेश मुझुमदार यांजकडून | १०,००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | श्री. दिनकर वामन वर्टी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती मीनल सतीश भुजले व श्रीमती रेखा मिलींद तेलंग यांजकडून | | ५०,००० |
| ५. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या द्वितीय पुण्यतिथीप्रसंगी पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | | ५१,००० |
| ६. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | | १,००१ |
| ७. | वागळे कुटुबीयांकडून | | १५,००० |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | हितचिंतक | | ५,००० |
| २. | श्रीमती रेखा शरद सलगर | ठाणे | १०,००० |
| ३. | श्री. महारुद्र वामन वागळे | मुलुंड | २,००० |
| ४. | श्री. शांताराम मधुकर किन्नरकर | खार | ५,००१ |



**Shailesh Gaitonde**
**Account Consultancy**

Office : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai 400066.
**Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 98692 11055 • **Office Time :** 10.00 a.m. to 6.00 p.m.

**COMPUTERISED ACCOUNTS SERVICES**

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80





हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.